कॅलिडोस्कोप

८ डिसेंबर
शनिवार

# प्रभावळकर साधणार संवाद


दिलीप प्रभावळकर

चतुरस्त्र अभिनेते दिलीप प्रभावळकर यांचा 'चिमणराव ते गांधी' हा टॉक शो पुण्यातील हिंदू महिला सभेच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. सभेतर्फे आयोजिण्यात येणाऱ्या अनेकविध समाजोपयोगी प्रकल्पांना आर्थिक मदत करण्यासाठी सदर टॉक शोचे आयोजन करण्यात आले आहे. बालगंधर्व रंगमंदिर येथे सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमासाठी देणगी प्रवेशिका आहेत. नाटके, चित्रपट आणि मालिकांमधील आपल्या विविध भूमिकांबद्दल स्वतः दिलीप प्रभावळकर उपस्थितांशी संवाद साधतील. त्यांना स्वतःला भावलेल्या काही व्यक्तिरेखांचे सादरीकरणही ते करतील. त्यांच्या काही दुर्मीळ चित्रफितीही दाखविल्या जातील.

**बालगंधर्व रंगमंदिर : सायं. ५**